# सुगंध

म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
क्र. २५४०

जगताप
वसंत वनमाळी







REFBK-0024942
REFBK-0024942

संदर्भ काव्य
२५४०
२४९४२
१५।५।८६

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५४०
२४९४२
काव्य १५।५।८६
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

# सुगंध

REFBK-0024942
REFBK-0024942

संपादक
डी. प. जगताप
वसंत वनमाळी

साहित्य चर्चा मंच

प्रकाशक :

डी. ए. जगताप
जे. व्ही. पी डी. स्कीम,
सी /६/११६, " स्वातीमित्र "
गुलमोहर क्रॉस रोड नं. ७
जूहू, मुंबई–४०० ०४९.

वसंत वनमाळी
८/१४७ " विजयी ज्वाला "
न्यू शास्त्री नगर, गोरेगाव (प)
मुंबई–४०० १०४.

मुखपृष्ठ
राजेंद्र पां. महाडीक

मुद्रक

येल्लप्पा चि. द्यावरकोंडा
श्रीकांत प्रिंटींग प्रेस,
येल्लप्पा द्यावरकोंडा चाळ, गांधी नगर,
जोगेश्वरी (पूर्व), मुंबई ४०० ०६०.

© साहित्य चर्चा मंच

प्रथम मुद्रण

फेब्रुवारी १९८६

मुल्य १२ रुपये

# काही शब्द

साहित्य रसिक वाचकांना '**सुगंध**' समर्पण करताना आम्हास अत्यानंद होत आहे. तसा आमचा सहकारी तत्त्वावर काव्यसंग्रह प्रकाशनाचा दुसरा यशस्वी प्रयत्न. एप्रिल १९८५ मध्ये दूरदर्शनचे ज्ञानदीप निर्माते **आकाशानंद** यांच्या शुभहस्ते '**पुष्पगुच्छ**' रसिकांना अर्पण केल्यानंतर वर्षभरातच दुसरा '**सुगंध**' काव्यसंग्रह प्रकाशित करीत आहोत.

**साहित्य चर्चा मंच** तशी बाल्यावस्थेतील. वयोमान फक्त एक वर्षाचे पण संघटनेची जिद्द मात्र जोरदार. नवोदित साहित्यिकांना हक्काचे व्यासपीठ मिळावे तसेच त्यांना चर्चेद्वारे साहित्यिक मार्गदर्शन मान्यवर विचारवंताकडून मिळावे ह्या उद्देशाने **साहित्य चर्चा मंचची** निर्मिती झाली. नवोदित साहित्यिकांची कलाकृती प्रामुख्याने चोखंदळ रसिकांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य कवी-संमेलने, साहित्य चर्चा, साहित्य स्पर्धा अशा विविध उपक्रमातून सतत केले जाते. पुस्तक प्रकाशनाद्वारे प्रसिद्धीचे माध्यम उपलब्ध व्हावे या गरजेपोटी आम्ही हा सहकारी तत्त्वावर काव्य ग्रंथ प्रकाशनाचा सोहळा साजरा करीत आहोत.

'**सुगंध**' काव्यसंग्रहाचा प्रकल्प आम्ही हाती घेतला तेव्हा नवोदित साहित्यिकांनी चांगलाच प्रतिसाद दिला. अनेक कवी मित्रांच्या कविता काव्य गुणानी परिपूर्ण असूनही काव्यसंग्रहाच्या मर्यादेअभावी '**सुगंध**' मध्ये त्यांचा समावेश करता आला नाही, त्याबद्दल आम्ही दिलगीर आहोत. '**सुगंध**' काव्यसंग्रहात नवोदित कवींना अग्रस्थान दिले आहे. त्याचबरोबर जुन्याजाणत्या कवींच्या कवितांचाही अंतर्भाव केला आहे एकूण ३४ कवी-कवयित्रींच्या कविता असलेला '**सुगंध**' रसगंधात विविध विषय, आशय आणि पुरोगामी विचारमंथनाचे पराग गुंफलेले आहेत.

'**पुष्पगुच्छ**' काव्यसंग्रहावर महाराष्ट्रातील साहित्य रसिक, पत्रकार, परीक्षक इ. कडून पत्रद्वारे सुमनांचा वर्षाव करण्यात आला. त्याच प्रेरणेतून आम्ही धाडसाने आत्मविश्वासाने हा दुसरा '**सुगंध**' काव्यसंग्रह मोठ्या उत्साहाने, आनंदाने, विनयपूर्वक रसिकांना सादर करीत आहोत. तुमच्या सहकार्याने व मार्गदर्शनाने **साहित्य चर्चा मंच** च्या कवींना प्रोत्साहन मिळावे. त्यांच्या हातून भावी काळात उत्तमोत्तम साहित्य कलाकृती निर्माण व्हावी आणि रसिक वाचकांची सेवा करण्याची संधी सतत लाभावी हीच सदिच्छा.

**डी. ए. जगताप**
**वसंत वनमाळी**

# अभिप्राय

'साहित्य चर्चा मंच' हे गतवर्षीच अस्तित्वात आलेले एक व्यासपीठ आहे. हे व्यासपीठ प्रामुख्याने नवोदित साहित्यिकांसाठी आहे. नवोदित साहित्यिकांना एकत्र आणावे, त्यांच्या साहित्यनिर्मितीचा आस्वाद घ्यावा, साहित्य चर्चेद्वारे विचारमंथन करावे, मान्यवर साहित्यिकांचे आणि विचारवंतांचे मार्गदर्शन त्यांना उपलब्ध करून दयावे, आणि साहित्यनिर्मितीबरोबरच साहित्याविषयीची जाण अधिकाधिक संपन्न करावी इत्यादी उपक्रम या मंचाद्वारे, वेगवेगळ्या परिसरात आयोजित केले जातात. या सर्व उपक्रमाबरोबरच नवोदितांचे साहित्य सहकारी तत्त्वावर प्रकाशित करण्याचे उद्दिष्टही प्रस्तुत मंचाने आपल्यासमोर ठेवले आहे. मंच अस्तित्वात आल्यानंतर दोन-तीन महिन्याच्या कालावधीतच 'पुष्पगुच्छ' हा कवितासंग्रह प्रसिध्द झाला, आणि आता 'सुगंध' हा कविता संग्रह प्रसिध्द होत आहे. साहित्य चर्चा मंचची ही वाटचाल कौतुकास्पद आहे. उपक्रमांतील सातत्य लक्षणीय आहे. त्यानिमित्ताने एकाअर्थी नवोदितांची जिद्दी संघटना निर्माण होत आहे. साहित्य क्षेत्रातही अशा संघटीत प्रयत्नाची आवश्यकता असते.

'सुगंध' या कवितासंग्रहात एकूण ३४ कवींच्या ७६ कविता आहेत. काही कवींच्या चारपाच, काहींच्या दोन आणि काहींच्या एकेक कविता आहे. ज्या कविता निवडलेल्या आहेत त्या मात्र नवोदितांच्या प्रातिनिधिक म्हणता येतील अशा प्रकारच्या आहेत. कोणत्याही नवोदित कवीची प्रारंभिक अवस्थेतील काव्यविषयक जाणीव काहीशी अपरिपक्व आणि अप्रगल्भ अशीच असते. अनुभवाने ती परिपक्व, प्रगल्भ व संपन्न होत जाण्याची शक्यता व संभवनियता असते. शक्यतेच्या या खुणा प्रस्तुत संग्रहातील कवितांत आहेत असे म्हणता येईल. अंतर्मुख वृत्तीने व्यक्तिगत भावजीवनातील मृदु, कोमल, हळव्या भावना व्यक्त करणाऱ्या कविता या संग्रहात आहेत. त्याचप्रमाणे बहिर्मुखवृत्तीने सामाजिक मनाची स्पंदने टिपून घेणाऱ्या कविताही या संग्रहात आहेत. पारंपारिक अर्थाने व रूढ शब्दात सांगायचे तर बहुतेक कविता प्रेम कविता व सामाजिक कविता अशा स्वरूपाच्या आहेत. अर्थात प्रातिनिधिक संग्रहात एक अडचण अशी असते की केवळ एखादया दुसऱ्या कवितेच्या आधारे विवक्षित कवीविषयी 'सामाजिक जाणीव असलेला' अथवा 'प्रेमविषयक जाणीव असलेला' कवी असा नेमका अभिप्राय देता येणे शक्य नसते. म्हणून मी हा अभिप्राय कवितांच्या संदर्भात व्यक्त केला आहे.

सामाजिक म्हणता येतील अशा ज्या कविता आहेत त्यातून सर्वसाधारणपणे सामाजिक विषमतेविषयी व आर्थिक विषमतेविषयी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त झालेल्या आहेत.

गटाराच्या शेजाराला माझे बाई घरकूल
रस्त्यावर दगडांनी पेटे माझी छान चूल

नाही भिंतीचा आडोसा नाही छत डोईवर
रस्त्यावर फूटपाथी संसार उघडयावर

असे 'उघडया संसारा' चे भेदक वास्तव दर्शन जेव्हा कवितेतून घडते तेव्हा रसिक वाचकही अस्वस्थ होतो. 'काळया वस्त्रांनी आपले नग्न रुप झाकून घेणारा चंद्र विवस्त्र छपरातून हळूच डोकावून झोपडीत दारिद्रयाचे नग्न स्वरुप पाहतो आणि दवरुपी अश्रु ढाळतो पृथ्वीच्या सृष्टीवर' यातून आर्थिक विषमतेची तीव्रता मग पुष्कळदा निसर्गही जाणवून देतो 'जलधारा' या एरवी सुखद असल्या तरी आर्थिक विषमतेचे बळी असलेल्या गरीब जनतेला त्याचं काय ?

सुखवी श्रीमंता या मुसळधारा
बुडल्या झोपडया विझल्या शेगडया
करिती बापुडया जीवन चिंधडया
दुःखवी गरीबा ते शोधी निवारा

ही समाजव्यवस्था विषमतेवर आधारलेली आहे तशीच ती शोषणाधिष्ठितही आहे. "मर मर काम करून पोटाला अन्न मिळत नाही. वणवण फिरून पाय दमून जातात. मनही विषण्ण होते." अशावेळी हतबल झालेल्या श्रमिकांच्या मनात मूलभूत प्रश्न मिर्माण होतो—

ऐतखाऊंना यथेच्छ जेवण । श्रमिका परी न मिळे अन्न
का हे सारे घडते देवा । पडतो आम्हा हा प्रश्न

अशावेळी कवीच त्याला आवाहन करीत असतो—

भाकरीच्या तुकडयासाठी । पाण्याचा घोटासाठी
गोंडा घोळू नकोस । उभा रहा ताठ मानेने

परंतु या शोषण व्यवस्थेविरूध्द एवढे आवाहन पुरेसे नसते म्हणून मग कवी आपल्या शब्दांमधले सामर्थ्यच जागवतो.

माझ्या शब्दांनो, आता पेटून उठा । या जळमटलेल्या संस्कृतीचा होम करा
माणसाला माणुसकी देण्यासाठी । माझ्या शब्दांनो, आता पेटून उठा
इथल्या अस्तित्वाची राख करा, नवनिर्मिती करण्यासाठी... ..........

"सुगंध" मधील समग्र सामाजिक कवितेचा प्रस्तावनेत परामर्श घेणे शक्य नाही. परंतु त्या कवितांचे प्रातिनिधिक स्वरूप लक्षात घेतले तरी एवढे निश्चित म्हणता येण्यासारखे आहे की "साहित्य चर्चा मंचा" वरील या कवींना सामाजिक वास्तवतेचे आणि हे वास्तव बदलून नवसमाजनिर्मितीचे भान आहे हे भान अधिकाधिक डोळस होत जाईल, जागृत राहील अशी अपेक्षा आपण करावी.

प्रेमकविता म्हणता येतील अशा ज्या काही कविता प्रस्तुत संग्रहात आहेत, त्यात पारंपारिकता बरीचशी जाणवते. याअर्थाने की त्यात ‘ भावानुभावाचे वैचित्र्य ’ विविध्य फारसे प्रत्ययाला येत नाही. अर्थात प्रारंभिक अवस्थेतील कवितामध्ये बराचसा भाग हा अनुकरणजन्य असतो. हे खरे असले तरी त्याचबरोबर हेही खरे की नव्या पिढीचे अनुभव जर वेगळे असतील तर त्या अनुभवाची अभिव्यक्तीही वेगळेपणाची जाणीव करून देणारी असावी. आणि आपण जर सामाजिक वास्तवतेचे भान ठेवणारे असू तर मग आपले भावजीवनातले अनुभवही शक्यतो वास्तवतेशी सुसंगत व सुसंवादी असावे असे मला वाटते. ‘ शिंपडलेले चांदणे ’, ‘ रातराणीचा गंध ’, ‘ पिठोरी पौर्णिमा ’, ‘ प्रियकर चंद्र ’, ‘ प्राजक्ताच्या तरूतळी ’ वगैरे संकेतात कविता गुंतून राहीली तर ती कृत्रिम अथवा अस्वाभाविक होण्याची शक्यता असते, रोमॅण्टिसिझम अथवा ज्याला स्वच्छंदवाद म्हणतात ती एक प्रवृत्ती आहे. ती प्रवृत्ती वास्तववादाला पूरक असू शकते तशी वास्तववादाला विरोधकही असू शकते. आपल्या कवितेचा प्रकृतिपिण्ड घडविताना नवोदित कवींनी हेही भान ठेवायला हवे असे मला वाटते.

लावणी, कोळीगीत, गवळण अशा काही पारंपारिक गीतप्रकारांची रचना, प्रस्तुत संग्रहात आढळते. नवा आशय व्यक्त करण्यासाठी पुष्कळदा जुन्या रचनाबंधांचा वापर केला जातो, तेव्हा त्या रचनाबंधानाही नवेपण येणे शक्य असते. कारण शेवटी अभिव्यक्तीपेक्षा आशयाला महत्व असते. अण्णाभाऊ साठे यांनी मुंबईची लावणी लिहिली किंवा नारायण सुर्वे यांनी गिरणीची लावणी लिहिली त्यातील नव्या अनुभवामुळे व आशयामुळे लावणी या रचनाबंधाचीही काव्यप्रतिष्ठा वाढली. म्हणून या जुन्या रचनाबंधनात कविता लिहिणाऱ्या नवोदितांनी आशयाकडेही जरा लक्ष दिले पाहिजे. मी हे लिहिले अशासाठी की जुन्याला माझा विरोध नाही. पण ‘ जुन्यातूनही नवी निष्पत्ती / काय नव्हे ती श्रेयस्कारक ’ हा केशवसुतांचा संदेश आपण लक्षात ठेवावा. जुन्याच्या आधारे आपल्याला नवी निष्पत्ती हवी असते ‘ रंग महाली घडीभर बसून जाण्याची ’ प्रवृत्ती ही काव्याच्या अंत:स्वरूपात अपरिहार्य ठरू नये, एवढा इशारा लक्षात असू द्यावा. ‘ साहित्य चर्चा मंच ’ हे नुसतेच नवोदितांना प्रकाशात आणणारे व्यासपीठ असावे असे मला वाटत नाही. मंचच्या सदस्यांसमोर सामाजिक ध्येयही असावे. मागच्या पिढीने आपल्याला काय दिले हेच महत्त्वाचे नसते. आपण पुढच्या पिढीला काय देणार आहोत याचेही भान हवे. या संग्रहात इयत्ता ८ वीतल्या बारा वर्षीय मुलांच्या चार कविता आहेत. आज हे बालकवी ‘माझे पप्पा’ ‘पोपट’ ‘ दादाचा बंगला ’ अशा विषयावर कौतुकास्पद कविता लिहीत असले तरी या उगवत्या पिढीला काव्याची जाण देण्याची बांधिलकी आजच्या पिढीलाच पत्करायला हवी ‘ पुष्पगुच्छ ’ चा ‘ सुगंध ’ पिढ्यानपिढ्या दरवळत रहावा अशी अपेक्षा असेल तर हे करायला हवे. साहित्य चर्चा मंचला मनःपूर्वक शुभेच्छा.

चैतन्य, १०९ जयप्रकाश नगर,
गोरेगांव ( पूर्व ), मुंबई ४०००६३.

सदा कऱ्हाडे

# संपादक



डॉ. ए. जगताप



वसंत वनमाळी

---

## पाठीमागील ग्रूप फोटोतील कवींची नावे

उजवीकडून-उभे- डी. ए. जगताप, रामचंद्र पिंपळकर, आनंद गंगणे, जोकीम घोन्साल्वीस, डॉ. आय. बी. मित्रे, सदानंद, बापू ओक, गोविंद पेंढारकर, सुधाकर बजाज, सौ. कमल देशमाने, राजाराम खरात, नरेंद्र पाटील, संजय रणदिवे, डी. आर. जोशी, गंगाधरसुत, काव्यतीर्थ कांचनचंद्र, प्रा. वि. द भोईटे, बा. धों. ताम्हनकर, भारत कवितके, वसंत वनमाळी.

बसलेले – राजेंद्र सैंदाणे, देवानंद भुवड, कु. अर्चना घार्गे, दशरथ तिखे, जगन्नाथ जाधव, दत्तात्रय संतावडेकर, जितेंद्र बजाज, सुनिल कापसे, चंद्रकांत लोखंडे.

सुगंध काव्य संग्रहातील

# कवी–वृंद



# सुगंधातील अंतरंग


❊ डी. ए. जगताप — पृष्ठ

दीपस्तंभ १

सोनू २

तूच का ? ३

हुंडा ४

❊ वसंत वनमाळी

नग्न चंद्र ५

संघर्ष ६

प्रेत ७

आठवते का ? ८

❊ प्रा. वि. द. भोईटे

सावळी ९

जलधारा १०

❊ गंगाधरसुत

फडफडणारे शीड ११

उषःकाल १२

जुळ्या बहिणी १३

जीवनाचे मर्म १४

श्रमिकाचे मनोगत १५

❊ दशरथ तिखे

उघडा संसार १६

❊ रामचंद्र पिंपळकर

मागणी १७

स्वार्थी पुढाऱ्यांनो ! १८

❊ नरेंद्र पाटील

छत्तीस गुण जमले म्हणून १९

असे जीवन असे मरण २०

❊ आनंद गंगणे — पृष्ठ

माझ्या शब्दांनो ! २१

जन्म २२

भूक २३

असं कोण म्हणतं ! २४

❊ काव्यतीर्थ कांचनचंद्र

इंदिरा गौरव २५

कविता २६

❊ कु. अर्चना घार्गे

दादाचा बंगला २७

वीज बोर्डाचा दिवा २८

❊ सुधाकर बजाज

तुझ्यामुळे २९

राखी ३०

❊ सौ. कमल देशमाने

कोडे ३१

माझा देश ३२

❊ बा. धों. ताम्हनकर

सय ३३

अशी एक संध्याकाल ३४

आम्हीच आमचं नशीब
बनवू ३५

निळ्या निळ्या आकाशी ३६

❊ डी. आर. जोशी

मनु ३७

पुनर्जन्म ३८

* दत्तात्रय ह. सैतावडेकर
  - मीलन ३९
  - संसार रथाची दोन चाके ४०
  - ओढती आसूड जे कोणी ४१
  - काळोख ४२
* जोकीम घोन्सालवीस
  - रुजवात ४३
  - काही खरे नाही ४४
* डॉ. आय. बी. मिस्त्रे
  - मृत्यू-पत्र ४५
  - मोडकळलेले स्वर ४६
* बापू ओक
  - गोम् ४७
  - यौवनाचा गजरा ४८
  - गवळण ४९
  - न लगे औषध ५०
* गोविंद पेंढारकर
  - माझे ५१
  - लोकल गाडीत ५२
* जितेंद्र बजाज
  - माझे पप्पा ५३
  - पोपट ५४
* जगन्नाथ बी जाधव
  - रंगमहाली ५५
  - गूढ ५६
* कु. शिल्पा अहिरे
  - रात्रीच्या गर्भात ५७
  - पाखरु ५८
* चंद्रकांत लोखंडे
  - तुझे चांदण्याचे रुप ५९
  - अंधाराची वाट जाळण्यासाठी ६०
* सुनिल कापसे
  - तुम्ही ६१
  - कवी आणि पाऊस ६२
* सागर म. पालवकर
  - वाहू श्रध्दांजली ६३
  - नशा ६४
* 'सदानंद' (सुरेश रामघरणे)
  - व्यसन ६५
  - भावना माझ्या मनीची ६६
* समता वनमाळी
  - माणूस आहे ओझे ६७
* संजय रणादिवे
  - टेलीव्हिजन ६८
* यशोधरा जगताप
  - तीन चिमण्या ६९
* राजेंद्र सैंदाणे
  - माझी होशिल का ? ७०
* भारत कावितके
  - मन अधीर झाले रे ७१
  - मी सुखात न्हाले ७२
* राजाराम खरात
  - माणूसकीचे नाते ७३
* देवानंद भुवड
  - शेला ७४
* सौ. मीना खरे
  - चूकामूक ७५
  - प्रेम कोणावर करावे ? ७६

# दीपस्तंभ

डी. प. जगताप

पेटविला ज्ञानदीप तुम्ही
स्त्री शिक्षणाचा
झेलून शेणामातीचे गोळे
अन् कर्मठांचे शिव्याशाप
हजारो वर्षे लादलेल्या गुलामगिरीच्या
पेकाटात घालून लाथ.
' चूल आणि मूल याच्याशिवाय
त्यांना काय कळतं '
म्हणणाऱ्यांची थोबाडं बंद केलीत
दात घातलेत घश्यात.
लुसलुशीत हिरव्यागार वेलीला बांधले
वटवृक्षाच्या गळ्यात ज्यांनी,
त्यांना जाग आणलीत तुम्ही.
वटवृक्ष उन्मळून पडला की,
निराधार, पोरसवदा वेलीचे वपन करणारे
धगधगत्या चितेत काठीने लोटणारे-
महाभाग ह्या देशात थोडे थोडके नव्हते
पण सोडविले त्यांना कसायांच्या हातून
' दीपस्तंभ ' झालात
वादळात सापडलेली नौका
किनाऱ्याला लावून तुम्ही.

*

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५४०
कृ. २५५५८६

# सोनू

डी. ए. जगताप

सोनू तू असा गोंडा घोळू नकोस
भाकरीच्या तुकडयासाठी
पाण्याच्या घोटासाठी
टिचभर निवाऱ्यासाठी
गोंडा घोळू नकोस-सोनू ।
उभा रहा ताठ मानेने
भाकरी, पाणी, निवारा देणे
त्यांचे आहे कर्तव्य
म्हणून गोंडा घोळू नकोस-सोनू ।
या जगात गोंडा घोळून-
अन् लाळ गाळून
काहीच नाही मिळत
म्हणून गोंडा घोळू नकोस-सोनू ।
तुला सोनू, तलवार चालविता येत नसेल
तुला बंदूक धरता येत नसेल
तुला बोलताही येत नसेल
तरी सुध्दा गोंडा घोळू नकोस-सोनू ।
तुझे मजबूत आहेत दात
तुझ्यावर अन्याय करणाऱ्यांचा
तुझ्या मागण्या न देणाऱ्यांचा
गळा फोड अन् पी रक्त घटाघटा
सोनू पी रक्त घटाघटा-सोनू ।

❋

# तूच का ?

डी. ए. जगताप

स्वप्नात येऊन हितगुज करणारी तूच का ?
चांदण्यारात्री चंद्राची सावली होणारी
तू अशी दुरावतेस का !
त्या दिवशी समुद्राच्या वाळूत
समुद्राच्या पाण्यात
मावळत्या सूर्याला साक्ष ठेवून
दिलास हातात हात
गुलाबी आकाश तेव्हा उतरले होते छान
तुझ्या गालावर
पाण्याचे थेंब दोघांच्या मस्तीत
होते उडत
त्याने शहारले अंग एकदम
माझे आणि तुझे
अजून आठवतोय तो दिवस
फुलांच्या ताटव्यात उभी होतीस
ढळलेला पदर सावरीत
तुझ्या भोवती फिरणाऱ्या भुंग्याकडे बघत
हलकेच घाबरुन बिलगलीस
छातीवर डोके ठेवलेस
अन् एकदम धस्स झाले–जाग आली
कोंबडयाच्या कुकूच कूने
समुद्राची वाळू, समुद्राचे प.णी
फुलांचा ताटवा होता फसवा
शंकेने पिंगा घातला
स्वप्नात येणारी, हितगुज करणारी तूच का? तूच का?

❋

# हुंडा

डी. प. जगताप

हुंडा देणं आणि घेणं
आहे पाप
टाहो फोडून सांगतात
सर्वजण ऐकतात
कथा, कादंबऱ्या, टी. व्ही, रेडिओत
हुंडयाच्या पेकाटात लाथ घालायची आहे ताकद?
'आम्ही हुंडा घेत नाही
आम्ही हुंडयाच्या विरुध्द आहोत'
मात्र शोभेसे लग्न करुन दया
अंगठी, घडयाळ, लॉकेट, मोटर
नाहीतर मोटरसायकल दिली तरी घेऊ
मुलीच्या आवडीचे पंचवीस तोळयाचे दागिने-
घालून पाठवा म्हणजे झाले.
'आम्ही हुंडा घेत नाही
आम्ही हुंडयाच्या विरुध्द आहोत.'
जेवणाचा बेत चालेल
मानपान मर्जीवर तुमच्या
मात्र थाटात वरात घोडयावर
बँडच्या तालावर
कारण मुलगा आहे डॉक्टर
इच्छा नाही झाली पुरी
जरी मुलगी असली मिळवती
तरी तिच्या मानेवर सुरी
नवरा खूष तर तुमची मुलगी खूष
'आम्ही हुंडा घेत नाही
आम्ही हुंडयाच्या विरुध्द आहोत.'

❋

# नग्न चंद्र

वसंत वनमाळी

निळ्या निळ्या नभातून
भटकणारा
नग्न चंद्र
जेव्हा आशाळभूतपणे
विवस्त्र छपरातून
हळूच डोकावून
झोपडीत पाहतो
तेव्हा दारिद्र्याचे
नग्न स्वरुप पाहून
चंद्र
दंवरुपी अश्रू ढाळतो
पृथ्वीच्या सृष्टीवर.
आणि
अलगद काळ्या वस्त्रानी
आपले नग्न रूप
घेतो झाकून काळोखात.
निळ्या निळ्या नभातून
भटकणाऱ्या चंद्राकडे
तेवढे तरी आहे.
पण झोपडीतल्या
विवस्त्र छपराखाली
फक्त आहे
नग्नता !
नग्नता !!
नग्नता !!!

❋

# संघर्ष

**वसंत वनमाळी**

माणूस होता माकड
माकड होता
चांगलं तेच होतं
निदान जात तरी
एक होती
माकडा माकडांची.
माकडाचा झाला
आदिमानव
झालं ते बरं झालं
निदान
प्राथमिक साम्यवाद होता
आदिमानवात.
आदिमानवातून
निर्माण झाला
माणूस
अर्धवट जगण्यासाठी
शोषित जगात–
जिथे होते चिरफाड
मनाची
आशा आकांशाची

अंतः करणाची
शरीराची
अहोरात्र.
प्रबळ शोषकासाठी
माणूस झाला आहे
गुलाम
वेठबिगार
स्वतःच्या अस्तित्वाची
आहुती देऊन.
पण आता
झाली आहे जाणीव
त्याला आपल्या
प्रबळ बळाची
प्रचंड ताकदीची.
सुरु झाला आहे
संघर्ष
निर्मितीसाठी
संपूर्ण मानव
मानवासाठी
नव्या जगासाठी.

# प्रेत

वसंत वनमाळी

या देशातील
सारी श्रमिक भूमी
एक स्मशान भूमी
येथे जन्मतात
फक्त प्रेतं
थंडगार हाडांचे सांगाडे.
येथील प्रेतं उभारतात
श्रीमंती
पिढीजात उपभोगणाऱ्यासाठी.
येथे करतात प्रेम प्रेतावर
पिळणारे.
थंडगार हाडांचे सांगाडे
चघळतात
भांडवलदार कुत्री
राजरोस
दिवसरात्र
अखंडपणे
स्वतःच्या सुखलालसेसाठी.
शेवटी—
प्रेत
प्रेत रहाणार नाही
त्यालाही येईल जाग
उठतील कबरस्तानातून
प्रेतं—
आणि पेटतील
लाल लाल मशाली
उगवत्या सूर्यबिंबासारख्या
श्रमिक जग निर्मितीसाठी.

*

# आठवते का ?

वसंत वनमाळी

आठवते का
तुला ते
चिंचेचे झाड ?
जिथं
प्रीत फुलली होती
ओठांच्या पाकळीत.
आठवते का
तुला तो
जिन्या खालचा अंधार ?
जिथं
प्रीतीची खूण
उमटली होती
ओठांच्या गालिच्यावर.
आठवते का
तुला ती
लज्जा ?
जेव्हा
गुबऱ्या गालावर
तांबुस रंग
हंसले होते.
आबठतो का
तुला तो
स्पर्श ?
जेव्हा
भान हरपले होते
अंधाराच्या कुशीत.
आठवते का
तुला ती

※

धुंद मिठी ?
जिच्यात
नाजूक फुलोरा
चुरगळला होता.
आठवतो का
तुला तो
डंख ?
ज्याने
कंचुकीचे बंध
सुटले होते.
आठवतो का
तुला तो
प्रणय ?
ज्यामुळे
भावनेचा गुलकंद
रात्रींच्या बरणीत
आंबला होता.
आठवते का
तुला ते
वचन ?
ज्याने
विवाहाचे बंधन
गुंफले होते.
आठव आठव
लाडके
घे त्याला
तुझ्या मिठीत
सर्वकाळ.

※

# सावली

प्रा. विष्णु द. भोईटे

ज्ञानी लाभली प्रेमळ सावली
अशी एक तू मवाळ माऊली

चंद्रमौळी, थोर अंतःकरणी
जी शहाळी, रसाळ गोड पाणी
आम्हा दिली, कृपासाई आपुली

मानी कांता, द्रष्टा असे धोरणी
पुत्र माता, अशी ही विरहिणी
त्यागा अर्पिले, तिने घरकुली

कार्यपूर्ति तव बुध्दि कल्पिती
महाज्ञाति वाहे सबळ नीति
दान दिले, मला असे असली

तळमळ, भूता मनी सकळ
गंगाजळ, वाटे झरा निर्मळ
प्यालो अमृत, भरुन ओंजळी

मम काया, शांत नितळ छाया
हीच माया, दावी माझी किमया
'स्वशब्द' देतो त्या पदकमली.

*

# जलधारा

प्रा. विष्णु द. भोईटे

पावसाळा–पावसाळी जलधारा
वाहतात होऊनी जीवनधारा
भरले आकाश, उरी तीव्र आस
हो ग्रीष्म नाश, तथा मृगाला जोश
करावी प्रसन्न, जलमय धरा
गरजे जलद, गडदगडद
कडाडे भय नाद, बिजली साद
ओघळती धारा, साथ चक्रीवारा
झाली धरणी, आनंदमय मनी
हसे फुलराणी झाडे पानोपानी
सुख फुलवी, जलद गळणारा
चाले नाच–गाणी साठलेल्या पाणी
हा खेळ–खेळगी हांसे त्यांचे चैनी
सुखवी श्रीमंता, या मुसळधारा,
बुडल्या झोपड्या, विझल्या शेगड्या
करिती बापुड्या, जीवन चिंधड्या
दुःखवी गरीबा, ते शोधी निवारा

❋

# फडफडणारे शीड

गंगाधरसुत

सुखद सुंदर रम्य प्रभाती
उभी तरुणी सागर तीरी
अथांग दर्या, अनंत आकाश
निळ्या आकाशी सुवर्ण प्रकाश ॥१॥

नृत्य नाजूक त्या लाटांचे
हेलकावणे त्या होडीचे
फडफडणे त्या शिडाचे
मन फुलकित करी युवतीचे ॥२॥

अमाप खजिना सागर तळी
परीक्षा तुझ्या कौशल्याची
तशीच तव हिमतीची
कसोटी आहे सामर्थ्याची । ३॥

जा जा सत्वर जा
इच्छा ठेवू नको तीरा
खेचुनि आण सागरसंपत्तीला
हीच आस मन मनाला ॥४॥

मावळतीचा सूर्य बुडाला
कृष्ण तिमीर नभी दाटला
चमचम तारा चमकू लागला
सखा अजुनि का नाही आला ॥५॥

कातरवेळी शांत सागरी
अगणित पक्षी घेत भरारी
परतुनि जाती निज कोटरी
हळू हळू येई शीड किनारी ॥६॥

सुख दुःखाचा, प्रतिक्षेचा
आशा आणिक निराशेचा
खेळ चालला नशिबाचा
तोच दिसे किरण आशेचा ॥७॥

आतुरले मन तुझ्याच मिलना
दिवसभराचा विरह सहेना
कटु काळहि त्वरीत जाईना
दिन झाला कसा सुनासुना ॥८॥

फडफडले शीड होडीचे
नृत्य थांबले लाटांचे
बादळ शमले शंकांचे
दर्शन झाले प्रिय सख्याचे ॥९॥

आला आला सजना आला
लुटुनि सागर संपत्तिला
पराक्रमाचा विजय जाहला
नैराश्याचा खेळ संपला ॥१०॥

# उषःकाल

गंगाधरसुत

निशेमागुनि धावत येई
पहा पहा हो, उषा
अंधाराचा नाश होऊनि
उजळीत चारी दिशा ।

पूर्व दिशेला सूर्य उगवला
लाली चढली पहा उषेला
लाजेने मग उषा लाजता
प्रसन्नता ती ये सूर्याला ।

मंजूळ किलबिल पक्षी करिती
जागे होऊनि झाडावरती
तोच कोकिळा सादही देती
जागे करण्या ही धरती ।

खांद्यावरती नांगर टाकुनि
पहा चालला शेतकरी
थंडी वारा पाऊस सोसून
शेतावरती काम करी ।

गुरे चालली रानामधी ती
पोरे त्यांच्या मागुनि असती
तोंडाने ती गाणे गाती
काही बासरी वाजविती ।

मंगल असल्या प्रातःकाळी
ललना कुणी तरी गाई
जात्यामध्ये सूर मिसळले
रम्य अशा उषःकाली ॥

*

# जुळया बहिणी

गंगाधरसुत

पिता तयाचा एकच असता
एकच गृही त्या नांदत असता
का प्रिती परी एकीवरती
दुसरीची तर नसेच खंती
जन्मस्थळ ते एकचि होते
विषाद मनी का पित्यास वाटे ॥१॥

जेष्ठ कन्यका शुभ्रवर्णी
सुशील सुंदर केतकीवर्णी
सदाच हसरे वदन तियेचे
अधरी नित्य ती लाली वसते
सुस्वरुप ती होती बाला
आली जणू ती जग जिंकाया ॥२॥

कनिष्ठ कन्यका कृष्णवर्णी ती
तिची होती कुरूप कांती
शुभ्र वर्ण तो झाला भंग
म्हणून लाभला काळा रंग
परंतु होती सुस्वभावी ती
तशीच सदगुणी निश्चित होती ॥३॥

भगिनी द्वयांचे अतुट प्रेम ते
पाहुनि वडिला चिंता वाटे
एकत्रित कधी असू नये त्या
विचार आला त्यांच्या चित्ती
तेव्हापासून झाली शिक्षा
वेगवेगळी झाली कक्षा ॥४॥

पिता मग वदे लघुकन्येला
'नच दावी तू तव मुखाला
कृष्णवर्णी हे घेऊनि वदन
पाही आता तू दुसरे सदन'
होत्या त्या जर जुळया भगिनी
शिक्षा दिधली का ही पित्यांनी ॥५॥

तेथून त्यांचे तुटले नाते
कधी न झाले मीलन त्यांचे
वाट पाहुनि संध्या थकली
उषा परि ना कधी भेटली
पुकार त्यांचा चालूच होता
उषा भेटसी कधी संध्येला ॥६॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५८०
दा. क्र.
शाखा (स्थान)

# जीवनाचे मर्म

गंगाधरसुत

आले कधी न जुळूनि
स्वर सूर जीवनाचे
नच ऐकले मी कानी
संगीत जीवनाचे !

शोधात मीही त्याच्या
फिरलो कितीक रजनी
परि सार जीवनाचे
कळले मला न अजुनि !

मंगल प्रभात समयी
कुणी भक्तीगीत गायी
घेऊनि एकतारी
भजनात दंग होई !

स्वर सूर दोन्ही मिळूनि
स्वरसाज येई जुळूनि
गुंगून जाई मन ते
ऐकून धून कानी !

रुप एक त्याही झाल्या
चित्तात वृत्ती दोन्ही
दंगून त्यात गेला
ईशगीत गात भजनी !

स्वरसूर तेथ जुळता
उरली न काही चिंता
मन मंदिरात बसली
ईशाची मूर्ती आता !

संगीत आज कळले
मज आज जीवनाचे
आले कळूनि मजला
ते मर्म जीवनाचे !

※

# श्रमिकाचे मनोगत

गंगाधरसुत

क्षितीजावरी लाली पसरली
सूर्यही आला वरती
जागृत झाले पशुपक्षी
अन् जागृत झाली धरती ।

कामकरी ते पहा निघाले
जाण्या कामावरती
खांद्यावरती पिकाव, फावडे
झरझर पाऊल पुढती ।

दिवस गेला काल तयाचा
नव्हती त्याची चिंता
पोटासाठी मिळेल का आज
हीच तयाची चिंता ।

कच्ची बच्ची, पोरेबाळे
बिऱ्हाड पाठीवरती
कामकऱ्यांचा तांडा चाले
तुडवीत सारी धरती ।

मरे मरे तो काम करूनि
पोटा न मिळे अन्न
वणवण फिरूनि पाय दमले
मनहि तसे विषण्ण ।

अन्नासाठी दाही दिशा
का फिरविशी जगदिशा
काय असा आम्ही केला गुन्हा
सांगशील का परमेशा ।

ऐतखाऊंना यथेच्छ जेवण
श्रमिका परी न मिळे अन्न
का हे सारे घडते देवा
पडतो आम्हा हा प्रश्न ।

असता आम्ही तुझी लेकरे
असा तुझा का न्याय
अजब रिती ही देवा तुझी रे
अजब तुझा हा न्याय ।

# उघडा संसार

दशरथ सिंखे

गटाराच्या शेजाराला माझे बाई घरकुल
रस्त्यावर दगडांनी पेटे माझी छान चूल

नाही भिंतीचा आडोसा नाही छत डोईवर
रस्त्यावर फुटपाथी संसार उघड्यावर

पलीकडे बंगल्यात मायबाप धनवान
आंबलेले कालवण शिळ्या भाकरी दान

मातीच्या ग साबणाने वस्त्रे गटारात धुई
कधी काळी आंघोळीला गटाराचे पाणी बाई

नाही सणसूद कधी हौस मौज सणावारी
सण ठावूकच नाही आशा ठेवू कशावरी

अंग दुखले खुपले कधी नाही दवापाणी
गोधडीला लपेटून गाई दुःखाची ग गाणी

उघडा संसार माझा पोरे नागडी उघडी
किती कष्ट केले तरी नाही हाताला बांगडी

इथे जन्मतात पोरे वाढती उघडी नागडी
गंध नाही शिक्षणाचा कोण लावील गोडी

थंडी उन्हाळ्याची आम्हा नाही तमा पावसाची
रस्त्यावरले आम्ही जीव उब घेतो ठेसनाची

जगाचा पसारा मोठा सारखा बदलतो
जग बदलले जरी आम्ही इथेच का रहातो ?

खंत नाही कुणालाच उघड्या ग संसाराची
जन मानसात आम्ही उकीरड्याचे ग धनी

*

# मागणी

रामचंद्र पिंपळकर

आभाळाकडे अश्रू मागतो
दुष्काळीतांचे थांबण्या अश्रू

मी भोगला मूर्दाडरंग जगण्याचा
समजू नकोस मला नेहमीसारखा

अंधाराचे वरदान संसाराला
काय रे, कसा रे तुझा डोळा लागला?

मारू किती हाका ऐकू कसे येत नाही?
यार ही वस्ती तुझी गुलाम आहे

वणव्यानं तिची केली शिकार
भाजून गेला जीव, कोरडा हा पावसाळा

सोडणार नाही मी माझ्या मागणीला
सारी माणसे अन् जनावरेही दावणीला

दाद कुठे मागू? प्रजा उघडी पडली
बंद वाऱ्याची घरे थंडाई फरार झाली

दाबा त्यांचा श्वास घेण्याचा
भोवऱ्यात फिरवू नको, दे दिलासा.

*

# स्वार्थी पुढाऱ्यांनो !

रामचंद्र पिंपळकर

दुसऱ्यांच्या स्तावर, रक्तावर
वळवळणाऱ्या किडयांनो —

बरबाद केलंत त्यांना
त्यांच्या अख्या पिढीला —

निर्धास्त राहा म्हणालात
बिनदास्त राहण्याचा सिग्नल दिलात
आणि हरामखोर निघालात —

नाड्या दाबून
मुस्काटबांधी करुन
स्वार्थी खुर्ची नाही सुटली

तो मिजास
चाटत बसलात
हाडं चघळणाऱ्या कुत्र्यागत

गटारावरची वस्ती
नरकाला स्वर्ग मानणारी
कसलं करता नेतृत्व त्यांचं !
मखमली गालीच्यावर लोळत

वाहवा ! रे समाजसेवा !
वाहवा ! छान वटविलात
फार्स समाजसेवेचा —

❋

# छत्तीस गुण जमले म्हणून

नरेंद्र पाटील

छत्तीस गुण जमले म्हणून
काकूनी आणली घरात सून
चार दिवस सुनेने सासूचे गुण गायिले
आणि मग आपले खायचे दात दाखविले
लग्नाला होताच दोन महिने
सून म्हणाली तोऱ्याने–
" आठ तास बाहेर करतेय मी नोकरी
चुलीपुढे बसून तुम्हीच भाजा भाकरी "
चार महिने झाले लग्नाला
सून म्हणाली सासूला–
" अशा या महागाईत हव्यात कशाला मोलकरणी ?
घरात बसून करता काय तुम्हीच धुवा धुणी "
सून आता घरात रुळली
सहा महिन्यांनी सासूला म्हणाली–
' राजा राणीच्या संसारात म्हातारीचे काय काम ?
पडा तिकडे गॅलेरीत तिकडेच करा आराम "
वर्ष झालं लग्नाला सून म्हणाली नवऱ्याला
" नसतो अडगळ म्हातारी पोचवा गावाला "
काकूच्या लेकाने, काढून आणले तिकीट–
आणि बिचाऱ्या काकूना बसवले एस् टी त
काकूने मारला कपाळावर हात
आणि म्हणाल्या मनातल्या मनात
मुलीच्या जातीला हवेत फक्त सद्गुण
काय करायचे आहेत मेले छत्तीस गुण ।

*

# असे जीवन-असे मरण

नरेंद्र पाटील

असे जीवन मी पाहिले आहे
जिथे दारिद्रय दरिद्री असते
पैशाने तिजोरी तृप्त असते
वाळवी देखील पैसाच खाते
असे जीवन मी पाहिले आहे
जिथे दारिद्रय श्रीमंत असते
दु:खाशिवाय खायला नसते
मुंगी देखील उपाशी मरते
असे मरण मी पाहिले आहे
ज्या मर्तिकाला पैशाचे हात असतात
तिथे माणसे देखील खूप जमतात
असे मरण मी पाहिले आहे
ज्या मर्तिकाला पैशाचे पाय नसतात
तिथे माणसांचे हात लुळे पडतात.

❋

# माझ्या शब्दांनो !

आनंद गंगणे

माझ्या शब्दांनो, आता पेटून उठा
या अथांग सागराला जाळून टाका
अमृताची गोडी चाखण्यासाठी ।

माझ्या शब्दांनो, आता पेटून उठा
या जळमटलेल्या संस्कृतीचा होम करा
माणसाला माणूसकी देण्यासाठी ।

माझ्या शब्दांनो आता पेटून उठा
या बाभूळ बनाला आग लावा
शांतिवन बनविण्यासाठी ।

माझ्या शब्दांनो, आता पेटून उठा
या सूर्यावर घाव घाला
प्रतिविश्व निर्माण करण्यासाठी ।

माझ्या शब्दांनो आता पेटून उठा
या आकाशाला जाळून टाका
तुमचे अस्तित्त्व शोधण्यासाठी ।

माझ्या शब्दांनो, आता पेटून उठा
इथल्या अस्तित्त्वाची राख करा
नव निर्मिती करण्यासाठी ।

*

## जन्म

आनंद गंगणे

असा कसा जन्म
करी गावकीचे काम
किती केला आटापिटा
नाही सुटला खराटा

हातात दूरडी भिक्षेसाठी
मागत फिरतो दारोदारी
नशीब असं फळलं
गरीबीचं देणं दिलं

जन्मा आलो चांडाळ
अंगात भरला विटाळ
रहातो वेशीबाहेर
भविष्यात सारा अंधार

नेकीनं करतो चाकरी
पोटाला मागतो भाकरी
तुमच्या थुंकीचा धनी
जिणं असं लाजीरवाणी

धरणीला माझा भार
घालीत फिरतो जोहार
असा कसा जन्म
करी गावकीचे काम

❋

# भूक

आनंद गंगणे

मला लागलीय भूक
पोटात पेटला वणवा
डोक्याचा झाला गोईंदा
ज्ञानेशाचे अमृत पिवून—
मला अमर व्हायचं नाही.
तुक्याची गाथा वाचून-
खटयाळ व्हायचं नाही.
रामदासाचा दासबोध वाचून—
सोवळं नेसायचं नाही.
एकनाथाची गाथा वाचून—
पाण्यासाठी गाढव व्हायचं नाही.
नामदेवाचे अभंग वाचून—
भंगुनि मज जायचं नाही.
चोख्यापरी डोंगा होऊन—
विठ्ठल दर्शन घ्यायचं नाही.
मला असं एक पुस्तक द्या हो
माझ्या पोटाचा वणवा विझला पाहिजे
पुन्हा भडकण्यासाठी.

*

# असं कोण म्हणतं !

आनंद गंगणे

जटा आणि दाढी वाढविली तर
ज्ञान वाढतं असं कोण म्हणतं ।
संसाराचा त्याग करुन संन्यासी झाला तर
परमेश्वर भेटतो असं कोण म्हणतं ।
संस्कृत लिहिता वाचता आलं तर
ब्रह्मज्ञान मिळतं असं कोण म्हणतं ।
रामनाम घेण्यात जन्म गेला तर
मुक्ती मिळते असं कोण म्हणतं ।
यज्ञयाग केला तर
पुण्य प्राप्त होते असं कोण म्हणतं ।
उपास तापास केले तर
देव नवसाला पावतो असं कोण म्हणतं ।
ब्राह्मणाला दान दिलं तर
पितरं स्वर्गात जातात असं कोण म्हणतं ।
सत्यनारायणाची पूजा घातली तर
मनाला शांती मिळते असं कोण म्हणतं ।
असं म्हणणारे जगात असतील तर
अशा सनातनांना काय म्हणावं ।

*

# इंदिरा–गौरव

काव्यतीर्थ कांचनचंद्र

दिव्य निरामय मंगल मूर्ती
प्रिय वदनेची सुदूर कीर्ती
विविध-धर्म जन, बहुविध भाषा
प्रतिपाळाची एकच आशा !

भारतवर्षं विराजित नारी
धीर गंभीर विराट विचारी
निश्चय थोर समोर समस्या
चालवि राज्यरथास सुहास्या !

राजकारणी सकल सुयोजक
घोर रणातहि शौर्य अलौकिक
कुशाग्रमति बहु अलभ्य सहसा
देशबांधवा सकल दिलासा !

थोर पिता सत्कीर्त जवाहर
रचिती मानवतेचे मंदिर
अपुल्या अर्पुनिया सर्वस्वा
कन्या रचिते मंगल कलशा !

वाहो ऊर्मिल समीर सुखकर
आणि तिरंगा फडको त्यावर
हो नित कांचनचंद्र मनीषा
एक इंदिरा तारिल देशा !

*

# कविता

काव्यतीर्थ कांचनचंद्र

तितकी साधी नाहि मुळी मीं
झाले माझे लाखो प्रेमी
कलिकाळातुन, फिरुन जगातुन
आज तुझ्या हे इथें पदार्पण !

भा. रा. तांबे, गिरीश, माधव
रंगुन आल्यें नुकती यांसव
वदूं विदेशी कशास नावे
प्रियकर होते सगळे उजवे !

आता एकच वृध्द राजकवि
गातिल ज्यांची कवी थोरवी
निरोप त्यांचा प्रेमळ घेउन
फिरत निघाल्यें होते वणवण !

काळ नवा अन् रीत वेगळी
काव्य पोचले कुठे रसातळि
मिळेल नोहे एक तरी गुण
थकल्ये ऐकुन, पाहुन, शोधुन !

जगीं तोतया कितेक बाया
मुखवटाच मम चढवुन जाव्या
कवी गाठण्या ठायी ठायीं
काव्यशास्त्र तें प्रमाण नाही !

काव्य गंध तव तीक्ष्ण केतकी
कुठुन कसा मम येई नाकी
हुंगत सुंगत आले त्यावर
माग काढिला तुझा नि इथवर !

तीक्ष्ण परी तू मुळीच नाहिस
मृदुल कोवळे तव हे मानस
पूर्ण गुलाबीं रंग तुझा तर
असा वेगळा समजो जगभर !

कविगुण पाहुन नाहिस पहिला
दुसरा येशिल तरी रसीला
दुसऱ्यामध्यें मिळतें काही
पहिल्यामध्यें तिळ तें नाहीं !

सुंदर कवि तू ! छानच झाले
की तुज येथें मीं बघ आल्ये
अनुभवास दे नवा शहारा
भोग मला दे मार्दव न्यारा !

प्रेमानें भरल्या, लालहि पण
तव अधरांचे घेइन चुंबन
तुझ्या भोवती घालिन पिंगा
स्पर्शांत तुझिया अवघ्या अंगा !

प्रणयाची अनिवार्य भुकेली
आहे मी बघ तशी नवेली
माझ्यासंगे लोभविणारे
खेळ करावे सर्वहि तू, रे !

जाशिल, राजा, सोडुन हें जग
होइन दुःखी फारच मी मग
शोधित जाइन असलें कोणी
आज, तरीही, मी तव राणी !

# दादाचा बंगला

कु. अर्चना घार्गे
( इ. ६ वी )

माझा दादा आहे दयाळू
पण थोडासा विसराळू
तसा दादा माझा खूप चांगला
त्याचा आहे छानदार बंगला ।

बंगल्यात आहे सुंदर बाग
रत्नांच्या झाडांची रांगच रांग
आजूबाजूला फुलांचा थाट
पाणी काढायला चंदनाचा रहाट ।

वाटेवर आहेत पाचूंची राने
सळसळ करतात सोन्याची पाने
ठिकठिकाणी छोटे छोटे डोंगर
नाचतात तेथे मोर अन् लांडोर ।

खळखळ वहातात निळे झरे
तिथे गुलाबी थंडी आणतात वारे
असा थाट आहे दादाच्या बंगल्याचा
तुम्ही पाहिल्याशिवाय नाही समजायचा ।

*

# वीज बोर्डाचा दिवा

कु. अर्चना घार्गे
( इ. ६ वी )

वीज बोर्डाचा दिवा
बटण दाबताच सुरु व्हावा
वीज बोर्डाचा लावला दिवा
तरीही मेणबत्या जवळ ठेवा ॥१॥

कुणी अभ्यासात दंग
कुणी कामात मग्न
तेवढयात वीज आगते
मध्येच विघ्न ॥२॥

वीज बंद तर पंखाही बंद
सर्वच काही बंद बंद
सर्वजणांचे थंडावतात
आपापले छंद ॥३॥

आजकालचे जीवन
वीजेवर अवलंबून
आहे वीज म्हणून
आकाशवाणी, दूरध्वनी, दूरदर्शन ॥४॥

वीज वापरताना
मजा येते फार
बील आलेले पाहून
होतात सारे थंडगार ॥५॥

# तुझ्यामुळे

सुधाकर बजाज

माणसात मिसळू लागलो
माणसांशी माणसासारखा वागू लागलो
प्रेमळ बनलो—तुझ्यामुळे.
प्रेम म्हणजे काय?
प्रेमात पडल्यानं कसं कसं होतं
ते कळू लागलं-तुझ्यामुळे.
मी तुझ्यावर प्रेम केलं
कधीच लग्न करणार नाही
प्रतिज्ञा मीं मोडलीं-तुझ्यामुळे.
तुझ्याशिवाय करमत नाही
कशात रस नाही, काही सूचत नाही
लोक प्रेमवीर म्हणू लागले-तुझ्यामुळे.
मीं लग्न करणार आहे—
घाबरु नको, तुझ्याशीच
पण हुंडा न घेण्याचं ठरविलय-तुझ्यामुळे.
प्रेमगीत, प्रेमकथा,
लिहू लागलो, गावू लागलो
कवी-संमेलनात कविता वाचू लागलो-तुझ्यामुळे.

❋

# राखी

सुधाकर बजाज

एक होती खार
घाई तिला फार
घेऊन हातात राखी
गेली जंगलापाशी ॥१॥

तिकडून आला वाघ
खारीला लागली धाप
वाघाला म्हणाली ' बंधू
राखी तुला बांधू ' ? ॥२॥

वाघ म्हणाला, ' बांध '
खार म्हणाली, ' थांब '
' वचन दे आधी
मग बांधते राखी ' ॥३॥

जंगलातील पशुपक्षी
नाही खाणार कधी
खारीने राखी बांधली
वाघाची जीभ आंबली ॥४॥

❋

# कोडे

सौ. कमल मा. देशमाने

हे परमेशा जगदीशा
संचार तुझा दशदिशा
सर्वत्र असशी मला दिसेना
कुठे राहशी मला कळेना ॥१॥

तू निर्माता तू परमात्मा
विश्वाचा या तूच नियंता
चिंता हरशी जन कल्याणा
कुठे असशी मला दिसेना ॥२॥

संभ्रम मजला कितीक गोष्टी
कशी निर्मिली सारी सृष्टी
"कोडे" हे मज उलगडेना
कुठे भेटशी मला कळेना ॥३॥

एक पुरुष अन् एक प्रकृति
असंख्य झाली प्रजा निर्मिती
बंधु भगिनी सारे असता
भांडती का मला कळेना ॥४॥

हिंदू मुस्लिम काळे गोरे
मांनव निर्मित भेदच सारे
माझे तुझे प्रेम दिसेना
समज कधी रे त्या येईना ॥५॥

रंजल्या गांजल्या दीनाहृदयी
तूच असतो त्या त्या ठायी
वाटे मजला तूच वेदना
सेवा करण्या बळ का येईना ? ॥६॥

*

# माझा देश

सौ. कमल मा. देशमाने

माझा देश माझा देश
माझा प्यारा भारत देश
अगणित भाषा अमाप वेष
सत्य एकीचा दे संदेश ॥१॥

मुकुट शिरी हिमालयाचा
नुपुर पदी रत्नाकराचा
कन्या नगाच्या गंगायमुना
परोपकारा करती साधना ॥२॥

स्वर्ग उतरला काश्मीर भुवनी
वर्ख पसरला अनंत सुमनी
सर्व अंगना इथे पद्‌मिनी
गर्व असे मज माझ्या भगिनी ॥३॥

ताजमहाल तो यमुनातीरी
'प्यारकसब' ते नयना हरी
अमृतसरच्या कनक राऊळी
तृप्त लोचना करिती सगळी ॥४॥

सूर्योदय अस्ताच्या वेळा
धन्य जाहली विवेक शिळा
असंख्य स्थाने सांगू किती
गाऊ किती मीं त्यांची महती ॥५॥

थोर हुतात्मे कितीक नरवर
लाल-बाल-गांधी-सावरकर
प्राण अर्पुनि हो अजरामर
झाले बहु होतीलही भूवर ॥६॥

*

# सय

बा. घों. ताम्हनकर

आला वैशाख महिना
मृग नक्षत्राचे दिस
वारा कवाचा फोफावे
होऊनिया वेडापिस

गर्दी मेघांची दाटली
काळवंडलेले नभ
टपटप कोसळती
त्याते पावसाचे थेंब

सृष्टी पावसात न्हाली
संतोषाचे हास्य गाली
झाडांनी डोक्यावर
घेतली इरली

पावसाच्या धारांतूनी
होई गारांचा वर्षाव
धरीत्रीच्या पोटी वाढे
उद्याचं स्वप्न नवं

गारा वेचता वेचता
थंडगार हात होती
जर तोंडात टाकल्या
क्षणि वितळूनी जाती

गारा वेचतांना होती
माझ्या संगे माझी सखी
बालपणीच्या सुखाची
सय येते ग सारखी.

# अशी एक संध्याकाळ

बा. धों. ताम्हनकर

अशी एक संध्याकाळ
सोनियाचे तेज ल्याली
पश्चिमेच्या भांगामधी
कुणी पिंजर भरली ?

अशी एक संध्याकाळ
वाहे मंद मंद वात
पाय मोकळे सोडून
वृक्ष बैसले जळात

अशी एक संध्याकाळ
उभी माडांच्या बनात
वितळले सर्व रंग
सोने बुडता पाण्यात

अशी एक संध्याकाळ
आली चांदणे लेवूनी
तिच्या पैंजणांचे नाद
मला भासती अजूनी

❋

# आम्हीच आमचं नशीब बनवू

बा. धों. ताम्हनकर

आम्हीच आमचं नशीब बनवू
नशीब आमच्या हाती आहे
दोन पैशांच्या सहानुभूतिवर
जगणं आम्हा नको आहे

कुबेराचे बाप तुम्ही
बनलो आम्ही कवडी कंगाल
पण लाचार बनून दरवाज्यावर
भीक मागण्या नाही येणार

आम्ही सुध्दा माणसं आहोत
कुत्री म्हणून जगणार नाही
रक्तामधला स्वाभिमान
गहाण कुणाकडे ठेवणार नाही.

*

# निळया निळया आकाशी

बा. धों. ताम्हनकर

निळया निळया आकाशी दिसती
अगणित तारे लुकलुकती
निळया निळया त्या धरतीवरती
कुणी पेरले मोती ?

विणले तोरण भूमिमंडपी
गुंफूनी गोप गोल मण्यांचा
की देवाच्या बागेमधला
सडा पडला प्राजक्ताचा ?

मला वाटते पक्षी बनावे
क्षणात एका उंच उडावे
वेचून वेचून त्यातील काही
झोळी भरुनी घेऊन यावे

पंख नाही अन् जाऊ कसा मी ?
शोभा निरखून पाहू कसा मी ?
खंत वाटते मनात माझ्या
कारण त्याचे सांगू कुणा मी ?

शक्तिमान तो कुणी न त्यासम
निल गगन ज्या बनविले
स्वर्ग मृत्यूच्या पडद्यावरती
टिकल्या काढून सजविले

सकाळ होता बसती दडूनी
रात्री पुन्हा येती कुठूनी ?
लपंडाव तो त्यांचा चाले
निळया निळया त्या गगनामधूनी.

*

# मनु

डी. आर. जोशी

असे मनु ही माझी मुलगी
दोनच वर्षाची
दुडदुड धावे इकडूनी तिकडे
ओळख प्रत्येकाशी

सदा खेळते भातुकलीचा
खेळ सखी घेवूनी
मध्येच येवून आईस म्हणते
खावू दे ग झणी

नाचनाचुनी गाणे म्हणते
टी. व्ही. चालू असता
हुबेहुब ती नक्कल करते
एकदाच ती बघता

खाऊचा तो मेनु ठरलेला
आईबाबापाशी
ऑफीसातूनी बाबा येता
झडती घेते त्यांची

स्मरणशक्ती ही चिवट मनुची
विसरत कधी ही नाही
खाऊचा तो मेनु बदलता
आठवण करुनी देई

खाऊ देता कधी न खाई
एकटीच मनु ती
आई दादा हळूच देवून
मग ती खाऊ खाई

फिरण्याची आवड तिजला
कळी खुलते मनुची
धुंद मोगरा गजऱ्यासाठी
आतूर होते ताई

दादाशी तो वाद चालतो
आई खरी कोणाची
आई माझी दादा म्हणता
रडते ओक्साबोक्शी

घाली समजूत आई मग ती
घेई जवळ तिला
आजीच्याहि मांडी बसता
खाऊ देते तिजला

अशी मनुही बाहेर जाता
करमत मजला नाही
या विरहाची जाणीव होते
जो कुणी बाबा होई

# पुनर्जन्म

डी. आर. जोशी

पूर्वजन्मीची ओळख आपुली
पटल्या आज खुणा
अपार केले प्रेम तुझ्यावर
घडला हाच गुन्हा

पूर्वजन्मीची मी सुचिता रे
तू होता सुकुमार
कुणा कळावे आपुले नाते
प्रेम ते अपरंपार

आठवते कां तुला साजना
पहिली वहिला भेट
गुलाब गाली फुलला होता
ओलीचिंब पहाट

नजर तुझी रे खिळली होती
माझ्या हृदयाशी
डोळ्यातील तो भाव जाणूनी
झाले वेडेपिशी

झुरले होते रात्रंदिन मी
सख्या साजनासाठी
स्वप्नामधुनी शोधीत होते
क्षण तो मिलनासाठी

गतजन्मी तू टाकून गेला
मजला एकाएकी
त्या दिवसाची झुरते राजा
रडते ओक्साबोक्सी

गतजन्मीचा हिशेब माझा
पुरा नाही तू केला
म्हणूनी या जन्मात सख्यां तू
प्रियकर होवूनी आला

पटेल खात्री तुझी राजसा
बघ तू डोळ्यामधूनी
देशील कां रे वचन मला तू
भाव जाणूनी मनी

मला भेटला देव जरी तो
विनवीन त्याच्यापाशी
साथ मिळावी तुझी राजसा
हीच विनंती माझी.

# मीलन

दत्तात्रय ह. सैतावडेकर

गात्र गात्र मोहरली
पाहताच लोचनी
गात्र गात्र हुंकारती
ये क्षणी ये क्षणी ॥१॥

गात्र गात्र पेटली
वासना कणोकणी
गात्र गात्र अधीरली
ये क्षणी ये क्षणी ॥२॥

गात्र गात्र कुजबुजली
शांतताही भंगली
गात्र गात्र बागडली
तव गात्रा भिडली ॥३॥

गात्र गात्र रंगली
चित्कारलीं चेष्टांनी
गात्र गात्र सुखावली
गात्रांच्या सादांनी ॥४॥

गात्र गात्र हरवली
तव गात्रालिंगनी
गात्र गात्र विसरली
स्थळकाळा या क्षणी ॥५॥

गात्र गात्र वितळली
धुन्द अशा मीलनी
गात्र गात्र शांतली
वासना नुरे मनी ॥६॥

# संसार रथाची दोन चाके

दत्तात्रय ह. सैतावडेकर

" मी आणि तू
एकाच संसार रथाची दोन चाके "
असे अनेक तत्ववेत्ते सांगून गेले

म्हणूनच की काय
तू आणि मी
एकाच रथाच्या दोन चाकांसारखे
संसाराचा गाडा ओढत
प्राणातील त्राण जाईपर्यंत
जीवनातील खाचखळगे पार पाडीत
प्रीतीच्या शोधात
अखंड धावत राहिलो

रथाच्या दोन चाकांसारखे
अखंड धावत राहिलो
एकमेकांशी कधीही न मिळणाऱ्या
दोन समान्तर रेषात !

# ओढती आसूड जे कोणी

( गझल )		दत्तात्रय ह. सैतावडेकर

ओढती आसूड जे कोणी तयांचे ना धरिले हात
ओढले आसूड ना मीं ही सूडाची टाकली कात

येऊनीं कीव ही त्यांची पुसू ना अश्रू शकलो मी
न झालो बाप अश्रूंचा म्हणून मी आज हा शान्त

धावलो नाही ऐकोनि कुणाचे शोक आक्रोश
नाहीं अन्याय मीं केला सांगतो आतल्या आत

पेटता क्रान्तीची ज्वाला जीव मी झोकला नाही
ओढले पाय ना त्यांचे हुतात्मे जाहले त्यात

पुण्य ते ना जरी केले करू जे शकलो नाही मी
ना मी कारण पापाला कुणी पामरही करतात

*

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. ........
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

# काळोख

दत्तात्रय ह. सैतावडेकर

काळोखाला लुटून
असंख्य प्रकाश कणांचा
साठा करणारा साठेबाज सूर्य
काळोखाच्या घरात
कधीतरी डोकावलाय का ?

जोपर्यंत सूर्य अस्तित्वाने कंपीत काळोख
स्वतःहूनच सूर्याचा मार्ग मोकळा करत असतो
तोपर्यंत सूर्य असाच चालत राहतो
आपल्याच तोऱ्यात
नाहीतर सूर्य मारतो एक लाथ
ढुंगणावर, मार्गात आडव्या येणाऱ्या काळोखाच्या.

काळोखा, तुझा जन्म लाथा खाण्यासाठीच आहे
तुझे भोग कधीच संपणारे नाहीत
जोपर्यंत, सूर्यपूजा करणारे अस्तित्त्वात आहेत.

सूर्याच्या सान्निध्यात
सूर्य होण्याची अपेक्षा
काळोखा, तू का करतोस ?
सूर्याच्या ठिकऱ्या ठिकऱ्या करुन
आकाश पोकळीतील काळोखात विखुरलेले
असंख्य चमचमणारे तारे निर्माण करण्याची ती दिव्यशक्ती,
काळोखा अजूनही तुझ्यात आहे कां ?

एक लक्षात ठेव
सूर्य तारे निर्माण करत नाही
सूर्य निर्माण करतो ग्रह
सूर्याने फेकलेले प्रकाशकण
लाचारीने झेलीत
सूर्याभोवती पिंगा घालणारे ग्रह

# रुजवात

जोकीम घोन्सालवीस

गेली न्हाऊन रात
शिंपडलेल्या चांदण्यात
रातराणीचा गंध वाहे
धुंद झाला आसमंत
रात्र अशी भिजलेली
करु रूजवात कोणाशी ।

लखख पिठोरी पौर्णिमा
चंद्र तिचा प्रियकर
मी अशी एकटी
प्रतिक्षेत तुझ्या वेडीपिशी
रात्र अशी भिजलेली
करु रुजवात कोणाशी ।

*

# काही खरे नाही

जोकीम घोन्सालवीस

काही अप्रुप
काही अनोखे
कशासाठी कोणासाठी
देणे आणि घेणे
अगदी देवाघरचे लेणे
काही वेळा अबोल
अन् मुके
डोळ्यात प्राण आणून
वाट बघताना
मन पाखरु
बेचैन उदास
का ?
आणि हा एकांतवास
अगतिकता -
छे
काही खरे नाही.

*

# मृत्यू-पत्र

डॉ. आय. बी. मिन्ने

माझा मृतदेह
कोणास आढळल्यास
तो ओळख पटवून
प्रथम माझ्या
प्रेयसीच्या ताब्यात द्यावा
मग,
माझ्या प्रेयसीने
माझ्या शवाचे तीन तुकडे करावेत
एक तुकडा,
द्यावा फेकून समुद्रात
ज्यानं मला अथांग प्रेमाचा वारसा दिला.
दुसरा मोठा तुकडा
टाकावा जगातील कुत्र्यासमोर
माझ्या मासानं
या सामाजिक आणि उच्चभ्रु कुत्र्यांची
ओरड आणि भूंकण तरी कमी होईल
तिसरा तुकडा माझ्या शवाचा
फेकावा गिधाडांसमोर
जी गिधाडं आकाशात उडून
माझ्या आकाशा इतक्याच
उच्च नि उदात्त प्रेमाची
साक्ष तरी देतील.

*

# मोडकळलेले स्वर

डॉ. आय. बी. मिस्त्रे

एखादया मोडलेल्या
सतारीच्या
गंजलेल्या तारे प्रमाणे मी
कोणीही उठावे
ताणावे मला मनसोक्त
आणि काढावेत
सूर, भेसूर
आणि आळवावेत राग.
मी देईन तुम्हाला सूर,
साथ देईन स्वरांची
माझ्या यथाशक्ती
पण, लक्षात असू द्या
मी गंजलोय, मोडकळीस आलोय
नेम नाही
कधी तुटेल तार
आणि
कधी विखुरतील ' स्वर '

*

# गोमू

बापू ओक

तांडेल - किती गोड हायस तू गोमू
साखर नग मला
ही पुनवरात चांदीची, दिलदर्या बहरला

गोमू - चांद रातीला तुजीच सोबत
माज्या सख्या तांडेला
वारा ज्वानीचा उरात भरला
संभाल मला तांडेला

तांडेल- माजा दर्याकिनारी बंगला
ताडामाडाव कोकील बसला

गोमू - मी दर्याची रानी रुपेरी
माज्या जाल्यात मासा चंदेरी

तांडेल - ये जवल ये

गोमू - मला कवेत घे

तांडेल - तुज्या डोल्यात काजवा चमकला

गोमू - तुज्या माज्या डोल्यात काजवा चमकला

# यौवनाचा गजरा

बापू ओक

माळिला मी सुरंगिचा गजरा
शैशव सरले यौवन आले
रोखुनि बघति नजरा ॥ माळिला ॥

लपू कुठे मी ऊर धडधडे
रिंगण घेती दोन पाखरे
जाता येता शीळ घालतो
माळावरला वारा ॥ माळिला ॥

काल पाहिले तुम्हास राया
वाटे मिलन व्हावे सखया
ओठ लाजरे उगाच हसले
जुळता अपुल्या नजरा ॥ माळिला ॥

ओघळली स्वप्नात प्रीत ती
मिठीत तुझिया राया राती
पुन्हा पुन्हा मी शोधुनि पाहे
खटयाळ हसरा गजरा ॥ माळिला ॥

❋

# गवळण

**बापू ओक**

मला भिजविले घननिळाने दही अमृत धारात
कशी कुठे जाऊ अशी ओल्यात ॥ ध्रु ॥

वाट लगबगा मथुरेची मी—
चुकवुनि जाते लपुनी छपुनी
पायी पैंजण उगाच हसले कान्ह आठवूनी
वेणू त्याची कशी वाजली
अवचित या कानात
कशी कुठे जाऊ अशी ओल्यात ॥ १ ॥

घट भरलेला शिरी दह्याचा
काठ नवा हा घट मातीचा
कुठूनि खडा आला फुटला घट हा
कान्हा उभा पुढयात
कशी कुठे जाऊ अशी ओल्यात ॥ २ ॥

मला न कळले काय जाहले
दही धारांचे अमृत झाले
मला वाटले खटयाळ कान्हा
चुंबित गेला त्यात
कशी कुठे जाऊ अशी ओल्यात ॥ ३ ॥

*

# न लगे औषध

बापू ओक

पहा लागली चमचम चमकू सोन्याची आंगठी
उरी दाटले वेड तयांचे ठेवू कसे ओठी ।

इकडून जाता, तिकडून येता
बोटात माझ्या दिसे
छबी सख्याची साखरपुड्याची
गाली खुदूखुदू हसे
आता धीर धरवेना चुंबी तिलाच मी ओठी । पहा ।

हिरव्या रानी राघू भिरभिरे
उरात घुमति दोन पाखरे
कसे आवरु तयास सांगा पदराच्या पाठी । पहा ।

आई पुसितसे काय जाहले ?
दृष्ट कुणाची लागे न कळे
सख्या जाणती गुपीत सारे
दमयंती मी झुरेच न लगे औषध मजसाठी

पहा लागली चमचम चमकू सोन्याची आंगठी
उरी दाटले वेड तयांचे ठेवू कसे ओठी ।

❋

# माझे

गोविंद रं. पेंढारकर

माझे माझे म्हणून मी जन्मास आलो
माता पित्याचे नाव जोडुनि
भाऊ बहीण सर्व माझे
आजा, आजी, काका, मामा सांगू लागलो
प्रपंचाशी नाते जोडले
श्री, कांता, धन जवळ केले
पुत्र, कन्या, मित्र माझे झाले
माझे म्हणून मी जन्मास आलो
सुखाचे समयी सर्व नाती
दुःखाचे समयी कोणी नसती
संधी साधू, आपमतलबी सर्व असती
माझे माझे सर्व मुखी वदती
सोडुनि सर्व तुटते नाते
विश्वात विलीन होऊनि जाते
निसर्गाशी एकरुप होते
माझे माझे म्हणून सर्व येथेच रहाते.

❋

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५४०
दा. क्र.
शाखा (स्थळ प्रत)

# लोकल गाडीत

गोविंद रं. पेंढारकर

धड धड आवाज होई
वळणे घेऊनि धावत येई
सो सो तिचा आवाज होई
कशी दिसते लोकल गाडी ।

रंगीबेरंगी वस्त्रे घालूनि
जाहिरातीचा प्रचार करुनि
हासत, डुलत, धावत येऊनि
स्टेशनावरती स्तब्ध होई ।

बसण्यासाठी जागा शोधीत
रमीचे शोकीन असती डब्यात
नफ्यातोटयाचा हिशोब नोंदित
अशी असते लोकल गाडी ।

कोणी प्रवासी भजन करती
कोणी प्रवासी पुस्तक बघती
कोणी प्रवासी चर्चा करती
म्हणून लोकल जिवंत दिसती ।

कोणी बंधू फुकटे असती
कोणी चित्तचोर शिटी वाजविती
कोणी भामटा खिसे कापती
अशी असते लोकल गाडी ।

# माझे पप्पा

जितेंद्र बजाज
( इ. ८ वी, वय १२ वर्षे )

पप्पा आमचे भोळे
मोठे त्यांचे डोळे
आमचे करतात लाड
त्यांना अभ्यासाचे फॅड ।

मारत नाहीत कधी
पण शब्दांची सुरी—
फिरते चराचर
अभ्यास होतो भराभर ।

आवडतात पप्पा भारी
आहे बरी त्यांची नोकरी
आम्ही झोपलेले असताना येतात
आम्ही झोपलेले असताना जातात ।

पप्पा आमचे भोळे
मोठे त्यांचे डोळे
आमचे करतात लाड
त्यांना अभ्यासाचे फॅड ।

✻

# पोपट

जितेंद्र बजाज
( इ. ८ वी, वय १२ वर्षे )

पोपट माझा ग पोपट माझा

चोच त्याची बाकदार
रंग तिचा लाल लाल
बोले कसा विठू विठू
पोपट माझा ग पोपट माझा ।

डोळे कसे गोल गोल
नजर त्याची आरपार
रंग कसा छानदार
पोपट माझा ग पोपट माझा ।

पेरू आवडे त्याला फार
मिरची खाई हिरवीगार
मला म्हणे सोड सोड
पोपट माझा ग पोपट माझा ।

✳

# रंग महाली

जगन्नाथ बी. जाधव

राया रंगमहाली तुम्ही आला
घडीभर बसून तरी जाना ॥धृ॥

साडी ठिपक्यांची आज मीं नेसली
बंद बाह्यांची चोळी मी घातली
चमेलीची वेणी आज मी माळली
तिचा सुवास एकदा तरी घ्या ना ॥राया॥

यौवनाला भरती माझ्या आली
जवानीची नशा मला चढली
आज ओठाला लाली मी लावली
डाळिंबीची चव तरी घ्या ना ॥राया॥

असं रोखुनि कशापाई बगता
नजरेला नजर का बरं लावता
असं हरणीला घायाळ का करता
मला बाहूत आपल्या घ्या ना ॥राया॥

*

# गूढ

जगन्नाथ बी. जाधव

प्रथम तुला मीं पाहिले
मन माझे तुलाच वाहिले

नजरेला नजर ही भिडली
वीज मनी लखलखली
मनात माझ्या तू भरली
वेड तुझे मला लागले ॥मन॥

मोहक रूप तुझे पाहुनि
मन माझे गेले मोहुनि
कसे हे सांगू तुला साजणी
हृदयी माझ्या तुझे प्रेम जडले ॥मन॥

तू खुद्कन गालात हसली
प्रित मनी ही ठसली
रीत तुझी असली कसली
तुझे गूढ आज मला कळले ॥मन॥

*

# रात्रीच्या गर्भात

कु. शिल्पा अहिरे

रात्रीच्या गर्भात असे उद्याचा उषःकाल
म्हणून उद्याची वाट पाहते मन माझे विकल
आज माझे जीवनतारू भरकटले
चुकले मी वाट
उद्या कदाचित मिळेल मंझिल
मिळेल पाउलवाट
पंख गळाले आज माझे
खुंटल्या साऱ्या आशा
उद्या पहाटे पुनर्जीवी मी
घेईन भरारी आकाशा
आज मी क्षुद्र बिन्दूजल
उद्या मीच अथांग सागर नील
उद्याचीच आशा धरुनी
जगते आहे कितीक काल
कारण मजला माहीत आहे
रात्रीच्या गर्भात असे उद्याचा उषःकाल

*

## पाखरू

कु. शिल्पा अहिरे

छोटं चिमुकलं एक
मी पाखरू बनावं
अमर्याद अशा 'ख' चं
एक खग मी बनावं ॥१॥

आभाळाच्या पाटीवर
कधी वर्तुळं आखावं
कधी सात ठिपक्यांचं
वृंदावन मी रेखावं ॥२॥

कधी नभाचं प्रतल
पंखापंखानं मोजावं
ओथंबणाऱ्या मेघांना
पंखांवरती झेलावं ॥३॥

सूर मारुनिया ऐसा
नभ छताला छेदावं
प्राण ओतुनी पंखात
दूर क्षितिज गाठावं ॥४॥

कधी एकाच झेपेत
चांदण्यांना मी गाठावं
कधी चंद्राचं चांदणं
पंखावरती माखावं ॥५॥

रोज सूर्याच्या साथीनं
गगनात विहारावं
अन रात्री, साक्षीनं चंद्राच्या
आसऱ्यास भूमींच्या यावं ॥६॥

# तुझे चांदण्याचे रूप

चंद्रकांत लोखंडे

तुझे चांदण्याचे रुप घेऊन उभी होतीस
प्राजक्ताच्या तरुतळी
नजरेने फुले फेकीत माझ्याकडे
मी फुलत भिजत होतो चिंब
अन् डोळ्यांच्या ओंजळीने
साठवीत होतो मनात ती गुलाबी सांज
तुझे निर्झरी तारुण्य अंगणात-
माझ्या मोहरत होते
पुन्हा पुन्हा स्मित फुलत होतीस
प्राजक्त नवे मनात
माझे डोळे तुझेच रुप पीत होते
आणि तू प्रसन्न श्वास घेत होतीस

# अंधाराची वाट जाळण्यासाठी

चंद्रकांत लोखंडे

आज प्रकाश असून सुद्धा
माझ्यापुढे अंधारच आहे
चांदणे असूनही मी
हिरमुसला आहे
समर्थ असूनही असमर्थाचे -
जीणे जगतो आहे
नशीब सुसाट धावताहे
मला उफराटा दम लागतो आहे
इथे सगळेच धावताहेत जळण्यासाठी
कोण कोणाच्या मागे हेच समजत नाही
एक श्वास दुसऱ्या श्वासामागे धावतो
यासच आम्ही जगणे म्हणतो
प्रकाश अंधारात विलीन होतो
तेव्हा आपण त्याला मरण म्हणतो
मग कोण समर्थ नि असमर्थ
कोणते जगणे आणि कोणते मरणे
मला जगायचे आहे
अंधाराची वाट जाळण्यासाठी.

*

# तुम्ही

सुनिल कापसे

करा खुशाल लांब भाषणे
दया तुम्ही हजार वचने
आम्ही गप्प ऐकत बसू
घालुनि तुम्हा पुढे आसने ।

लोक म्हणतात तुम्हाला आधार स्तंभ
अरे ! कसले तुम्ही आधार स्तंभ
मीं तर म्हणेन घालुनि तुम्हाला -
पेटवा बंब ।

तेवढा तरी उपयोग होईल
तुमच्या सुटलेल्या पोटाचा
तुम्ही विचार केला आहे का ?
आमच्या पोटापाण्याचा ।

तुम्ही थोडा विचार करा
तुमच्या कृष्ण कृत्यांचा
हृदयात डोकावून पहा -
अन् सोडा विचार असत्याचा

☀

# कवी आणि पाऊस

सुनिल कापसे

आला आला पाऊस आला
कविता करण्या कवी बैसला
विचार करुनि लिहू लागला
मोती मोती घरळू लागला ।

काव्यगुच्छ तो गावू लागला
काव्यपुष्प तो ओवू लागला
लिहिता लिहिता बरळू लागला
चमके विदयूत लता जशी बाला ।

मांडी घालूनि कवी बैसला
छानश्या कविता प्रसवू लागला
पावसालाही मग जोर चढला
काळाकुट्ट अंधार झाकळला ।

गड गड गड आवाज झाला
आवाजाने मग कवी उडाला
भीतीने त्याने धसका घेतला
जाऊनि गप्प कोपऱ्यात बैसला ।

*

# वाहू श्रध्दांजली

सागर म. पाळवकर

या भूमीची आपण लेकरे
भारत वृक्षावरील पाखरे
चांगले कृत्य करुनि संपुया
देश बांधवासाठी देह वाहू या ।

ज्यांनी वाहिले प्राण ते महान
त्यांची स्तुती करण्या वाटे अभिमान
शहीद झाला घराला मुकला
देश आझाद करण्या देह वाहिला ।

चला वाहूया त्यांना आदरांजली
भावपुष्पे माझी अबोल झाली
स्वतः झिजून चंदनाप्रमाणे
अहिंसा, सत्य प्रेम दिले त्याने ।

एक चमकता तारा लोपला
ध्रुवतारा तुटूनि पडला
एकजुट होवूनि शत्रूला चारू खडे
वाजवू स्वपराक्रमाचे चौघडे ।

प्राणाची लावू या बाजी
'हमसब एक है।' सांगून गेल्या इंदिराजी
भारतभूच्या रक्षणा फौज सज्ज झाली
हीच असे थोर हुतात्म्यांना श्रद्धांजली ।

*

# नशा

सागर म. पालवकर

माझे शरीर अग्नीच्या ज्वालेत शिजत होते
'पाहुणी' केव्हाची ताटकळत उभी होती
कोणी अश्रु पुसे तर कोण हसे
माझ्या पोटात मृत्युपूर्वी गेलेला दारुचा पेग
अजून पोटात झोके घेत होता
हो ! मृत्युपूर्वी मी जरुर शरीर घेतले होते–
एका रखेलीचे विकत
तीच फक्त रडत होती
हसऱ्या चेहऱ्याने तिने मला फुलविले होते
मी भुंगा होऊन मद गोळा केला
ओंजळीत घेऊन पाकळीत सोडला
तृप्त होऊन तिने मदिरेचा पेला दिला होता
तोच माझ्या पोटात हेलकावे घेत होता
पण –
मी प्यालेल्या दारुत नशाच नव्हती

❋

# व्यसन

'सदानंद' (सुरेश रामधरणे)

व्यसन तुझे श्वसन झाले
आसन जीवनाचे डळमळले
वसन आत्म्याचे जीर्ण होता
रंग त्वचेचे फिके पडले ।

शिस्त गेली छान गेली
गेला रूबाब सारा
ध्येय गाठण्या आधीच
तू रे गाठला किनारा ।

एकरूप एकरंग व्हावे
झाड कलम केलेले
व्यसन अन् मेंदूचे असते
नाते असेच जडलेले ।

अस्तित्व जळते सुंभाचे
परि पीळ तया न सोडी
शरीर गळते आत्म्याचे
तरी व्यसनास तो न तोडी ।

लोक म्हणती जीवन तुझे
तुझ्याशी घृणा करते आहे
पण ! त्यांना काय माहीत
त्याचे व्यसनावर प्रेम जडले आहे ।

*

# भावना माझ्या मनीची

'सदानंद' (सुरेश रामघरणे)

भावना माझ्या मनाची तुला कधी कळलीच नाही
वेदना माझ्या जीवाची हृदयी तुझ्या सललीच नाही

माय-पित्याच्या सुस्वप्नांची केली मी राखरांगोळी
तोडिले बंद रेशमांचे झाले तव प्रितीने खुळी
अर्चना माझ्या प्रितीची कानी तुझ्या आलीच नाही । भावना ।

दुरावले जगास मी केवळ प्रिया तुझ्याचसाठी
स्थिरावले इथेच मी केवळ प्रिया तुझ्याचसाठी
संवेदना त्यागाची माझ्या तुला कधी ज्ञातीच नाही । भावना ।

संसार सुखाच्या चांदण्यात नाहले मनसोक्त मी
प्रितीचा मधु चाखण्याशी जाहले आसक्त मी
कल्पना प्रतिभेची माझ्या तुला कधी पेललीच नाही । भावना ।

अर्पिले सर्वस्व माझे तुझ मानिले पतिदेवता
प्रणय सुखाचा मिलनी ना दाविली कधीन्यून्यता
वासना भोळया जीवाची तुला कधी कळलीच नाही । भावना ।

# माणूस आहे ओझे

समता वनमाळी

माणूस
सकाळच्या प्रहरी वाहतो ओझी
कंबरच खचली वाहून वाहून
ओझी.
ओणवा ओणवा वाहतो ओझी
ओझेच त्याचे झालेय शरीर
शरीराचे ओझे कोणते आणखी ?
ओझे आहे माणूस
माणूस आहे ओझे
वाकले आहे ओझ्यानेच
पुरे शरीर
ओझ्यातच त्याचे आता
सुख आहे
त्याच्या सोबत त्याची
सोबत आहे
त्याची रात्र आहे ओझे
त्याचा दिवस आहे ओझे
त्याचे पुरे जीवन आहे ओझे
त्याच्यावाचून जाणे कुठे – ?
शरीर थकले आहे
मन बंड करते
पण –
ओझे आहे माणूस
माणूस आहे ओझे !

*

# टेलीव्हिजन

संजय रणदिवे

आमच्या शेजारी रहातात भिडे
प्रायोजित कार्यक्रमाचे फारच वेडे
बहुतेक सर्वंच कार्यक्रम पहातात
टी. व्ही. स आपला मित्रच मानतात
जाहिरातींचा परिणाम घरात आहे सारा
सकाळी उठल्यावर. ताजचा स्वाद न्यारा
मुलगा त्यांचा डबलने न्हाहतो
व्ही. आय्. पी. नबाबाचीच बनियन घालतो
' ममीं क्या बनाती हो ? ' म्हणून विचारतो
तर टू मिनिटस् न्यूडल्स आवडीने खातो
हॅलो शाम्पूने रौनक आली आहे
क्लियरसिल इमामीने घरच भरलय
तर लॅक्मे व गार्डनने तिला चांगलीच सजवलीय
भिडयांची बायको नाव रजनी
ललिताजी तिची मैत्रिण
घरात झुमरु नावाचा नोकर
फ्रायम् सकाळी नास्त्याला करते
सहकार मसाल्याने जेवण बनविते
डब्यातून कधी कधी टँगो सुध्दा पाठविते
भिडे मात्र त्या साऱ्याला कंटाळले आहेत
खानदानचे काय होणार या काळजीने ग्रासले आहेत
टी. व्ही. कर रद्द झाला
पण प्रयोजकांना तोंड कसे देणार
ह्या विचारात पडले आहेत.

*

# तीन चिमण्या

यशोधरा जगताप

तीन बाई चिमण्या भारी चिव चिव
करतात सर्दव भोवती
घरकुल मांडून बसती
मित्र मैत्रिणी सभोवती ।

मोठी आहे लबाड भारी ।
हवे तिला ती मागुनि घेते
आजचे काम उदयावर टाकते
कामापुरते गोड गोड बोलते ।

मधली चिमणी हट्टी आणि करारी
घरात दरारा निर्माण करते
भावी काळाची स्वप्ने बघते
उंच आकाशात भरारी मारते ।

छोटी चिमुरडी गोड भारी
हसते मोहक दिसते सुंदर
तिच्या पप्पाची लाडकी फार
सर्वात आहे तीच दिलदार ।

मंगल दिवस पळत येईल
सनई चौघड्याच्या तालात
चिमणा चिमणीला घेऊन जाईल
आम्ही पाहू निळ्या निळ्या नभात ।

*

# माझी होशिल का ?

राजेंद्र सैंदाणे

सौंदर्याचा घेऊनि साठा आलीस तू सजणी
किती जणांना वेड लाविले सांग राणी

तुझ्या पाठी सारे लागले पराग लुटण्या टपले
माही भुललो तुझ्या रुपाला वेड लागले तुझ्यामुळे

माणिक मोती गळा सोनेरी वस्त्र सोहळे
ह्या सर्वांना फिके करील रुप तुझे निराळे

मदनाची चाल तुझी मस्त दिसे खळी
मुखडा तुझा असा रुपेरी काया भरदार साळी

एका नजरेने मोहून टाकले चुंबक रुप तुझे
आनंदाचे उधाण आले मनात माझ्या तूच दिसे

पाहुनि मजला थांबशील का ? बघशील का ?
तुझ्या शब्दाचा आतुरलेला एकदा बोलशील का ?

कसले लागले वेड मला प्रीत मजवर करशील का ?
तुझेच स्वप्न बघत असतो माझी होशील का ?

*

# मन अधीर झाले रे

भारत कवितके

पुन्हा-पुन्हा दोन्ही डोळे भरुनी आले रे
सांजावल्या वेळी मन अधीर झाले रे ॥
या आसवांना माझ्या पुसणारे हात तुझे
या व्यथांना माझ्या सुखविणारे शब्द तुझे
आज माझ्यासाठी नाही उरले रे । १ ।
सांजावल्या वेळी ......................

राजाची राणी होण्याचे माझे स्वप्न नव्हते
तुझ्या पायाची दासी होण्यात भाग्य होते
असे कसे दैव माझे ते भाग्य ना लाभले रे । २ ।
सांजावल्या वेळी ....................

उन्हात चांदण्याच्या फिरताना मिळूनी
हळूवार स्पर्शात घडलेली ती कहाणी
अजूनही नाही मी विसरुन गेले रे । ३ ।
सांजाबल्या वेळी ................ ......

*

# मी सुखात न्हाले

भारत कवितके

काय मागू देवा, कोडे मला पडले
माझ्या या संसारी मी सुखात न्हाले ॥

भाळी माझ्या कूंकू सौभाग्याचं
वारते मला लाख लाख मोलाचं
बालिका होते मीं सुवासिनी झाले । १ ।
माझ्या या संसारी ......................

भोळ्या या मनाला सुख पेलवेना
माझ्या या नयनाचे आसु आवरेना
तू दिलेले सुख हे पुरे झाले । २ ।
माझ्या या संसारी ... ...................

दृष्ट लागेल का रे सांग कुणाची
ही भिती माझ्या वेड्या मनाची
या कल्पनेने मीच मला हसले । ३ ।
माझ्या या संसारी ....... ................

❋

# माणूसकीचे नाते

राजाराम खरात

माझ्या हातात रिकामी थाळी
अंगात नाहीत कपडे अन् काया काळी
आम्हा गरीबासाठी नाही निराळी
करा दिवाळी नाहीतर होळी

श्रीमंत करतात साजशृंगार घरोघरी
गरीबाच्या संसाराची वरात आहे न्यारी
चुलीत तीन दगडांच्या जाळायला नाहीत लाकडे
करा दिवाळी नाहीतर होळी

श्रीमंतासाठी हवी तशी रोटी
गरीब करतो त्याच्यासाठी मजूरी
पण तेच विसरले आज आम्हाला
करा दिवाळी नाहीतर होळी

आज आम्हाला कोणी विचारीत नाही
" कसे हो तुम्ही कंगाल आणि भुके "
कुठे शोधावे माणूसकीचे नाते
करा दिवाळी नाही तर होळी

*

# शेला

देवानंद भुवड

सिमा नाही कर्तृत्वाला
एक इवलिशी चंचू
फुटे पाषाणा पाझर
करी कलेचा उध्दार ।

मिळवूनि काडीकाडी
एका माय माऊलीने
उंच झाडीच्या फांदीला
महान कार्य साधिला ।

चिमुकल्या दोन पंखा
संकटाच्या सामन्यास
एक ध्यास एक जिद्द
आम्ही सदैवच सिध्द ।

जग जीवनाची विणा
यशस्वी झंकाराला
लय ताल, सुर, राग
बघ अद्वितीय त्याग ।

प्रगतीच्या विश्वामध्ये
तुझी तुलाच प्रेरणा
श्रम हाच केंद्रबिंदू
तरावया विश्वसिंधू

महा कष्ट गेले फोल
ऊरी घरोटयाची हाव
तरी भिडे तुफानासी
दैवी दुःख सहवासी ।

गाळूनि जलापरि घाम
माऊलीच्या ममतेने
एक गुंफियेला शेला
लेकुरांच्या आधाराला ।

अरे डोळस मानवा,
सांग जरा आंधळयास
बघ श्रम अतोनात
एक पाखराची जात ।

*

# चूकामूक

सौ. मीना खरे

चूकामूक नेहमीच होत असते
सद्-विवेकबुध्दीची आणि सारासार विचाराची
हव्याश्या वाटणाऱ्या क्षणांची आणि
अवेळी येणाऱ्या पाहुण्यांची,

इच्छा आणि कृतीची,
धो धो पडणारा पाऊस आणि
कमालीच्या उत्कटतेने हव्याश्या वाटणाऱ्या एकांताची

न्याय्य मागणीची आणि भांडवलशाहीची
सदाचार आणि अविवेकाची
हळवेपण आणि व्यवहाराची
हिरव्या चुडयांनी नटलेली नववधू आणि
तिचे माहेरपण आणि माहेरी गाजत
असलेले बालपण ह्यांची

आता यातली कुठली चूकामूक
आपल्याला ‘ हवीशी ’ वाटते आणि
कुठली चूकामूक ‘ नकोशी ’ वाटते
हे ज्याचे त्याने ठरवायचे

*

# प्रेम कोणावर करावे ?

सौ. मीना खरे

प्रेम कोणावर करावे ?
सागराचे रौद्र स्वरूपही तटस्थपणे पाहणाऱ्या खडकावर
की कोणाच्या तरी ओढीने दूरवर उडणाऱ्या खगराजावर
माणसाच्या महत्वाकांक्षेवर की
माणसाच्या स्वप्नपूर्तीच्या उमेदीवर ?
माणसाने जतन केलेल्या आपुलकीवर की
विश्वासावर ?

प्रेम काय ?
कोणावरही करावे
अगदी भरभरून करावे
अगदी एकरूप होऊन करावे
सर्वस्व अर्पण करून करावे
पण एक मात्र व्हावे
शापित चाफा मिळाला तरी चालेल
पण निर्माल्य नको
पिवळी पडलेली पाने चालतील
पण पाचोळा नको.

REFBK-0024942
REFBK-0024942

❋

# ऋणनिर्देश

साहित्य चर्चा मंच ह्या संघटनेला आणि काव्य संग्रहाच्या निर्मितीला विविध क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींचे सहकार्य लाभले आहे. त्यांच्याकडून आम्हाला सतत मार्गदर्शनाबरोबर प्रोत्साहनही मिळाले आहे. त्यामुळेच नवोदित कवीमध्ये एकप्रकारची जिद्द निर्माण झाली आहे. साहित्य क्षेत्रात कलाकृतीची निर्मिती करण्यास ज्यांनी उत्साहीत केले आहे, अशा सर्वांचा नामनिर्देश करणे जरी शक्य नसले तरी प्रामुख्याने पुढील व्यक्तींचा नामनिर्देश करणे अगत्याचे आहे.

कवी आणि साहित्यिक श्री. रॉक कार्व्हालो, श्री. दया पवार, डॉ. सदा कऱ्हाडे, श्री. नारायण सुर्वे, श्री. बबन काळे, श्रीम. वंदना विटणकर, डॉ. राधिका पिंपळस्कर, डॉ. शशिकांत लोखंडे.

दै. नवाकाळचे सहसंपादक श्री. दत्ताराम बारस्कर, दै. लोकसत्तेचे सहसंपादक श्री. शरद कारखानीस, श्री. विश्वनाथ मोरे, दै. मुंबई सकाळचे सहसंपादक श्री. नारायण पेडणेकर.

लोकप्रिय नगरसेवक डॉ. रमेश प्रभू, मुंबईचे डेप्यु शेरीफ श्री. पी. जी. वनमाळी, ज्ञानदीप निर्माते मान. आकाशानंद, समता ज्ञानदीप मंडळाचे अध्यक्ष श्री. रमेश जाधव, प्रशा. अधिकारी श्री. रा. वि. कोरडे, श्री. मुरारराव राणे, पश्चिम मुंबई विभागाचे सहाय्यक कामगार आयुक्त श्री. एम. एच. परांडेकर, तसेच सर्वश्री गंगाधरसुत, प्रा वि. द. भोईटे, दशरथ तिखे, रामचंद्र पिंपळकर, सुधाकर बजाज, आनंद गंगणे. काव्यतीर्थ कांचनचंद्र, गोविंद पेंढारकर, राजाराम खरात, आ. सो. वनमाळी यांचे बहुमोल सहाय्य लाभले आहे.

श्रीकांत प्रिंटिंग प्रेसचे मालक श्री. येल्लप्पा चिन्नय्या द्यावरकोंडा यांनी ठरलेल्या मुदतीत सुबकपणे छपाईचे काम करून दिले. श्री. राजेंद्र पां. महाडीक यानी अल्पावधीत नेटके, आकर्षक मुखपृष्ठ काढून दिले तसेच प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहकार्य ज्यांनी ज्यांनी केले त्या सर्वांचे आम्ही ऋणी आहोत.

संपादक

डी. ए. जगताप

वसंत वनमाळी